Lalita Gandbhir
4200 North Ocean Dr.
# 1501- 2
Riviera Beach, FL 33404
lalitagandbhir@hotmail.com

# टोर्नेडो (**Tornado**)

वातावरण धूसर

क्षितिजावरची माडाची झाडं अचल

क्वचित पावसाचा थेंब पडतोय

भूतलावर काळ्या पांढऱ्या ढगांचं छत

आसमंतात सतत उडणारे पक्षी

कुठेतरी लपलेत

अकस्मात त्या छतावरती

एक पांढरट लवचिक लेखणी उमटली.

हळूहळू फिरत ती पृथ्वीवरती

काहीतरी लिहू लागली.

मनाला पुसटशी धोक्याची

चाहूल स्पर्श करून गेली.

पण त्या दृश्याने माझ्यावरती

मोहिनीचं जाळं पसरलं.

पाय जमिनीला खिळले.

क्षितिजावर रोखलेली नजर हलेना.

अंबरावरती काळाचं तांडवनृत्य

सुरू होऊन

जगसंहार होण्याची वाट बघत मी

निश्चल उभी राहिले.

पूर्वप्रसिद्धी 'एकता'  अंक १४७/जानेवारी २०१५